
पारावरच्या गप्पा

# ऊसाचा खोडवा देईल नफ्याचा गोडवा!

## योग्य व्यवस्थापन, प्रगत तंत्रज्ञान आणि नीट देखभाल मात्र हवी



गणपत देवदर्शन आटोपून पारावर संपतची वाट पाहात बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसत म्हणाला, ''काय गंपा, आज निवांत दिसतोय. आज काही काम दिसत नाही!''

यावर गणपत म्हणाला, ''कारं, असं का म्हणतोय? शेतकऱ्यांना काही काम नाही असं तुला कधीपासून वाटायला लागलंय? शेतकरी सततच काही ना काही कामामध्ये बिझी असतोच. त्याला काही सुट्टी असतेय व्हय! कालच सर्व ऊस तुटून गेलाय. ऊसाचे उत्पादन काही मनासारखे मिळाले नाही, त्यामुळे विचार करत होतो की ऊसाचा खोडवा ठेवावा की नाही? कारण एकतर यावर्षी आडसाली ऊसाचे टनेज बऱ्याच प्रमाणात घटले. त्यात यावर्षी हुमणीमुळे ऊसाच्या वाढीवर परिणाम होऊन ऊस पातळ झालाय. म्हणून विचार करत होतो की ऊसाच्या खोडव्याचं काय करावं? एकदा वाटलं ऊसाचा खोडवा ठेवला नाही तर दुसरे पीक गहू करावं. परंतु गव्हाचा उत्पादन खर्च एकरी १५ ते २० हजार रुपये येतो आणि उत्पादन येतं फक्त २५ ते ३० हजार. म्हणजे ४ महिने काम करून एकरी ५ ते १० हजार रुपये मिळतात. म्हणजे गव्हाचे पीक परवडत नाही. दुसरे कोणते पीक करावे असा विचार करत होतो.''

यावर संपत म्हणाला, ''हो रे गंपा, तू म्हणतोय ते खरंय. हंगामी पिकांचा उत्पादन खर्च भरमसाठ वाढलाय. परंतु त्या प्रमाणात शेतीमालाचे भाव काही वाढले नाहीत. तू म्हणतोय तसं गव्हाचा विचार केला तर दोन मशागती, पेरणी, बियाणे, खतं, खुरपणी, औषधे, पाणी भरणे, काढणी करणे हा सर्व खर्च २० हजार रुपयांच्या घरात जातो. त्यामुळे गव्हाचे पीक परवडत नाही. दुसरे पीक म्हणजे कांदा. परंतु कांदा म्हणजे फारच अशाश्वत पीक. लागली तर लॉटरी नाही तर कांद्यामुळे वांदा होतो. हरभरा, मका यासारखी पिकेही पाहिजे त्या प्रमाणात उत्पन्न देत नाहीत. त्यामुळे मला तर वाटतंय, कमी उत्पादन आले तरी ऊसाचा खोडवा ठेवलेला बरा. कारण मशागतीच्या वाढलेल्या खर्चापासून सुटका होते. तसेच मजूर आणि इतर खर्चही जास्त नाही. त्यामुळे यावर्षी मी ठरवलंय, उत्पादन कमी आले तरी चालेल पण ऊसाचा खोडवा ठेवायचा. ऊसाचा खोडवा ठेवला तर हुमणीमुळे पडलेल्या ऊसातील गॅप (नांग्या), खोडव्याचे कमी टनेज आणि कारखान्यांकडून मिळत असलेला कमी भाव या समस्या आहेत. परंतु आपली गत इकडे आड तिकडे विहीर अशी झाली बघ गंपा. पण यातून रस्ता काढून पुढे जावे हेच शहाणपणाचे लक्षण आहे.''

यावर मात्र गंपाने मान डोलावून होकार देत संपतला विचारले, ''पण हे सांग मला संपा, तू म्हणतो की ऊसाचा खोडवा ठेवायचा पण खोडव्याचे चांगले उत्पादन येण्यासाठी काय करावं, असं तुला वाटतंय? कारण चांगलं उत्पादन आलं तरच हे पीक आपल्याला परवडेल बघ संपा! नाही तर शेवटी खोडव्याचे आलेले उत्पादन आणि ऊसाचा दर यांचा मेळ घातला तर इतर पिकांपेक्षा कमी पैसे नको मिळायला.''

यावर संपत म्हणाला, ''तू म्हणतो ते बरोबर आहे गंपा. पण आपण ऊसाचा खोडवा ठेवताना दोन बाबी डोळ्यासमोर ठेवल्या पाहिजेत. एक तर खोडव्याचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे आणि दुसरे म्हणजे उत्पादन वाढविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. आता हे बघ गंपा, खोडवा ठेवताना त्याच्या मशागतीचा खर्च कमी कसा करता येईल यावर विचार करणे महत्त्वाचे आहे. यासाठी खोडवा फोडणे, खोडव्याला माती लावणे खुरपणी करणे यावरचा खर्च कमी करण्यासाठी ऊसामध्ये पाचटाचे आच्छादन करणे फार महत्त्वाचे आहे. ऊसाच्या पाचटाची कुट्टी करून त्याचे आच्छादन ऊसाच्या दोन रांगांमध्ये व्यवस्थित पसरून द्यावे, जेणेकरून खोडवा चांगला उगवेल. तसेच पाचटाच्या आच्छादनामुळे पाण्याची बचत होईल. गवताची वाढ होईल आणि पाचट कुजून जमीन-पिकाला खतांची उपलब्धता होईल. यामुळे उत्पादन खर्चात बचत होईल.''

मध्येच संपतला थांबवून गणपत म्हणाला, ''पण संपा, ऊसाचे पाचट ठेवल्यामुळे एकतर मशागत चांगली करता येत नाही आणि दुसरं म्हणजे ऊसाला आवश्यक असलेली रासायनिक खते देता येत नाहीत. त्यामुळे ऊसाच्या उत्पादनात घट नाही का येणार?''

यावर संपत म्हणाला, ''हे तर महत्त्वाचे आहे गंपा, उत्पादन खर्च कमी करण्याची ही एक चांगली पद्धत आहे. ऊसाचा खोडवा आपण ऊसाला चांगली पांढरी मुळे येण्यासाठी करतो. परंतु ज्यावेळी ऊसात पाचटाचे आच्छादन करतो त्यावेळी पाचटाखाली ऊसाला चांगली पांढरी मुळे येतात. ऊसाचे पाचट कुजत असताना ह्यूमस नावाचा पदार्थ तयार होतो, तो ऊसाच्या पांढऱ्या मुळांना चांगला आवडतो. त्यामुळे पांढरी मुळे चांगली वाढून ऊसाची चांगली वाढ होते. त्यामुळे ऊसाच्या आंतरमशागती म्हणजेच खोडवा फोडणे, खोडव्याला माती लावणे यासारख्या मशागती कराव्या लागत नाही आणि त्यामुळेच उत्पादन खर्चात बचत होते. तुझा दुसरा प्रश्न म्हणजे ऊसाला रासायनिक खत कसे टाकावे? सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊसामध्ये पाचटाचे आच्छादन केले तर आपण ४० ते ५० टक्के रासायनिक खतांची बचत करू शकतो, जी काही रासायनिक खते टाकायची ती आपण विविध पद्धतीने टाकू शकतो. ठिबक सिंचन असेल तर आपण ऊसाला ठिबकच्या माध्यमातून खते देऊ शकतो. ऊस ४ ते ५ महिन्यांचा होईपर्यंत थोडे थोडे खत आपण ठिबकमधून देऊ शकतो. ठिबक नसेल तर पहारीच्या सहाय्याने खतांची मात्रा दोन वेळा देऊ शकतो. तेही शक्य किंवा अवघड वाटत असेल तर ज्यावेळी ऊसाच्या पाचटाची कुट्टी करतो त्याचवेळी खोडव्याला आवश्यक असलेली खते विशेषत: स्फुरद, पालाश तसेच सूक्ष्म अन्नद्रव्ये पाचटावर फेकून दिली तर ज्यावेळी आपण पाचट व ऊसाच्या दोन रांगांत टाकतो त्यावेळी पाचटावर टाकलेली सर्व खते खालून जातात; ही खते नंतर ऊसाला उपयुक्त ठरतात. नत्रयुक्त खतांचा म्हणजेच युरियाचा वापर नंतरच्या काळात म्हणजेच ३ ते ४ महिने थोड्या थोड्या प्रमाणात आपण पाण्यापुढे दिला तर नत्राची उपलब्धता पिकाच्या वाढीनुसार होते म्हणजेच या पद्धतीने खतांचा वापर केला तर उत्पादन खर्चात बचत होते. अर्थात ठिबक सिंचन पद्धतीने आपण ऊसाचे उत्पादन घेत असू तर मात्र अत्यंत कमी रासायनिक खतांच्या मात्रेतही खोडव्याचे चांगले उत्पादन मिळू शकते.''

संपतचे म्हणणे गणपतला पटत होते कारण त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव सांगत होते की गणपतच्या मनात येणाऱ्या अडचणींवर काहीतरी उपाय आहे! तरीही मध्येच गणपतने विचारले, ''मला एक सांग संपा, ऊसाचे पाचट ठेवले तर ते लवकर कुजते काय? त्याचे खत तयार व्हायला किती वेळ लागतो? दरवर्षी आपण पाचट ठेवले तर चालते काय? त्यामुळे जमिनीवर काही अनिष्ट परिणाम होत नाही काय? कीड-रोग यांचा प्रादुर्भाव वाढतो काय? उंदरांचे प्रमाण पाचटामुळे वाढते काय? कारण काही शेतकरी सांगतात की ऊसाचे पाचट

ठेवल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात.''

यावर मात्र संपत मोठ्याने हसत म्हणाला, ''नाचता येईना म्हणून अंगण वाकडे, अशी गंमत आहे बघ अनेक शेतकऱ्यांची गंपा. जेव्हा आपण पाण्यात पडतो तेव्हाच पोहायला शिकतो की नाही? अनेक जण काहीही करायच्या आधीच त्यातल्या अडचणी सांगून मोकळे होतात. मी मागील वीस वर्षांपासून ऊसाचे पाचट जाळत नाही. एकतर ऊसामध्ये आच्छादन करतो किंवा त्याची कुट्टी करून जमिनीत गाडतो. कारण वनस्पतीचा कोणताही अवयव हेच खरे जमिनीचे खाद्य आहे. शेण- विष्ठा, काडी-कचरा हेच खरे जमिनीचे खाद्य आहे. तिचा नाश करणे, पेटवून देणे म्हणजेच आपण आपल्याच संपत्तीला काडी लावून दिल्यासारखे आहे. म्हणून ऊसाचे पाचट आपण दरवर्षी जमिनीत गाडले तर जमिनीचा पोत सुधारतो. विशेषत: जमिनीचा सेंद्रिय पदार्थ वाढतो त्यामुळे पिकाचे उत्पादन वाढते. ऊसाचे, पाचटाचे आच्छादन केले तर ३-४ महिन्यात पाचट कुजते आणि समजा जास्त वेळही लागला तरी आपल्याला घाई नाही. कारण खोडव्याची तोड १२ ते १४ महिन्याने येते. तोपर्यंत ऊसाच्या पाचटाचे पूर्णपणे खत तयार झालेले असते. ऊसाच्या पाचटामुळे उंदीर वाढतात ही सुद्धा पूर्णपणे चुकीची धारणा आहे. ऊसाच्या पाचटामुळे ऊसावर किंवा इतर कोणत्याही पिकावर रोग-कीड वाढत नाही. म्हणून पाचटाचे आच्छादन डोळे झाकून कर. अर्थात ऊसाच्या खोडाचे डोळे उघडे राहतील याचा विचार करूनच पाचट पसरावे. पाचट पसरविल्यानंतर खोडव्याचे बुडखे, म्हणजेच वरून तुटलेला ऊस छाटावा. म्हणजेच ऊसाला फुटवे जमिनीच्या खालून येतील. जेथे नांगे पडलेले असतील ते नांगे त्याच प्लॉटमधल्या दाट फुटलेल्या ऊसाची खोडं काढून भरावेत. त्यामुळे ऊसाची संख्या चांगली होण्यास मदत होते. नांगे भरल्यानंतर एक-दोन पाणी वरचेवर द्यावे जेणेकरून नांगे भरलेली रोपे वाळणार नाहीत. पाचटामुळे गवताची वाढ जास्त होत नाही. खोडव्यामुळे गवत आले तर जमीन भुसभुशीत असल्यामुळे लवकर उपटून येतात. म्हणून खुरपणीचा खर्च वाचतो. वाटल्यास एखादी तणनाशकांची फवारणी करावी. म्हणजेच ऊसाचा खोडवा चांगला आणायचा असेल तर सर्व गोष्टींची काळजी घ्यावी लागते. ऊसाच्या खोडवा पिकाला कमी खर्च येत असला तरीही हे काही फुकटचे पीक नाही. यासाठी आपण खोडव्याची जेवढी काळजी घेऊ तेवढ्या प्रमाणात आपण त्याचे उत्पादन वाढवू शकतो. परंतु अनेकदा शेतकरी खोडव्याकडे दुर्लक्ष करतात आणि नंतर म्हणतात, उत्पादन कमी आले, खोडवा पीक परवडले नाही म्हणून.''

गणपतही संपतच्या या म्हणण्यावर सहमती दर्शवत म्हणाला, ''संपा, मला तुझे म्हणणे पटले पण आपण खोडव्याचे एकरी किती उत्पादन घेऊ शकतो? आताच तू म्हणाला की जेवढा खर्च करू त्या प्रमाणात खोडव्याचे उत्पादन वाढते म्हणून.''

यावर संपा म्हणाला, ''हे बघ गंपा, खोडव्याचे उत्पादन तीन-चार बाबींवर अवलंबून असते. एक तर ज्या पिकाचा तू खोडवा ठेवलाय ते ऊसाचे पहिले पीक कसे होते- कारण पहिले पीक चांगले नसेल तर त्याचे खोडवा उत्पादन फार मोठ्या प्रमाणात आपण वाढवू शकत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे तुझी जमीन कशी आहे- जमिनीच्या प्रतीनुसार खोडव्याचे उत्पादन कमीजास्त प्रमाणात वाढणार. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे आपण खोडव्याची एकूणच कमी काळजी घेतो. त्यावर ऊसाची वाढ आणि उत्पादन अवलंबून आहे. ऊसाच्या खोडव्याचे उत्पादन बघितले तर काही शेतकरी एकरी १०० टनांपर्यंत उत्पादन काढतात. परंतु आपण आपल्या जमिनीची सुपीकता आणि पहिल्या पिकाची अवस्था बघून प्रत्येक वेळी २० ते २५ टक्के उत्पादन वाढ करण्याचे नियोजन करून त्यानुसार तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. ऊस खत व्यवस्थापन, पिकांवर संजीवकांचा वापर, सूक्ष्म सिंचन पद्धत यासारख्या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले तर नक्कीच आपण खोडव्याचे उत्पादन चांगल्या प्रकारे वाढवू शकतो.''

संपतने ऊस खोडवा व्यवस्थापनावर सविस्तर विश्लेषण केल्यामुळे गणपतही खूष झाला व म्हणाला, ''चल, मी ठरवलं, ऊसाचा चांगला खोडवा पिकवणार आणि चांगले पैसे मिळवणार. आता तुला ऊसाच्या या साखरेपासून बनविलेला चांगला गोड चहा पाजतो, चहा पिऊन लागू आपल्या कामाला.''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**